**Government College of Engineering**
**Station Road, Osmanpura, Chha.Sambhajinagar– 431 005**
In Pursuit of Global Competitiveness
Phone : (0240) 2366101, 2366102,103, 110, 111 Fax : (0240) 2332835
E-Mail – principalgeca@yahoo.com Web – http://www.geca.ac.in

जा.क्र. शाअमछसं /उपहारगृह/निविदा/२०२६/3061 दिनांक – / /२०२६
05 SEP 2026

## – निविदा जाहिरात –

शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय (स्वायत्त),छत्रपती संभाजीनगर या संस्थेतील उपहारगृह कंत्राटीतत्वावर खानावळ चालविणेकरिता वर्ष २०२६ ते २०२७ या अकरा महिने दोन लिफाफा पध्दतीने मोहरबंद स्वतंत्र निविदा मागविण्यात येत आहेत. निविदा फॉर्म, माहिती, शर्ती, अटी व नियम हे शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या विद्युत भांडार, विद्युत अभियांत्रिकी विभागामध्ये दिनांक ०७/०९/२०२६ ते १८/०९/२०२६ पर्यंत रोख रूपये १०००/– (एक हजार) भरून सकाळी ११.०० ते सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत (फक्त कार्यालयीन दिवशी) मिळतील. तसेच निविदेतील अटी व नियम हे या संस्थेचे संकेतस्थळ http://www.geca.ac.in यावर उपलब्ध आहेत. सदरील मोहरबंद निविदा दिनांक २३/०९/२०२४ सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत प्राचार्य,शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय, स्टेशन रोड, छत्रपती संभाजीनगर ४३१ ००५ या पत्यावर पोहचतील अशा रितीने पाठविण्यात याव्यात.उशिरा आलेल्या निविदांचा विचार केला जाणार नाही याची नोंद घ्यावी. प्राप्त झालेल्या निविदा दिनांक २८/०९/२०२६ रोजी सकाळी ११.३० वाजता या संस्थेच्या इलेक्ट्रीकल सेमिनार हॉल येथे उघडण्यात येतील. इच्छुक निविदाधारकांनी उपस्थित राहावे.

(डॉ.संजय शामराव डंभारे)
प्राचार्य,
शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय,
छत्रपती संभाजीनगर

प्रत :– १. मुख्य सुचना फलक
२. वसतिगृह सुचना फलक
१. संगणक विभागास वेबसाईटवर अपलोड करण्यासाठी

## ३) उपहारगृहाबाबत काही महत्वाच्या अटी व शर्ती :—

१. कंत्राटदारास उपहारगृहाच्या जागेचे दरमहा भाडे रू.५०००/—(पाच हजार रूपये मात्र) व विद्युत वापराचे वापराचे प्रचलित दरानुसार महिन्याच्या दहा तारखेच्या आत संस्थेच्या रोखा विभागात भरावे लागेल.

२. सदर निविदा हे उपहारगृह सुयोग्य दर, सकस आहार व सक्षम अनुभवी व्यक्तीची / संस्थेची उपहारगृह चालविण्यास निवड करण्यासाठी असून केवळ एकंदरीत कमी दराच्या आधारे निविदा मंजुर होईल असे नाही. एकुण सभ्यता, मालाची किंमत आणि पौष्टीकता, गुणवत्ता, स्वच्छता इ. बाबत तुलनात्मक तपासणी करुन सर्व निर्णय घेण्याचे समितीस अधिकार आहे.

निविदांचे आधारे तसेच प्रत्यक्षात चौकशी करून व मुल्यमापन करून नियुक्त समितीच्या अंतिम पाहणीनुसार सक्षम उपहारगृह चालकास उपहारगृह चालविण्यास देण्याचा अंतिम निर्णय घेण्याचे संपूर्ण अधिकार समितीस मा.प्राचार्य यांना प्राप्त आहेत.

३. निविदा उघडतांना प्रथम मोहोरबंद निविदा अ (तांत्रिक लिफाफा) उघडण्यात येईल. निविदा अ (तांत्रिक लिफाफा) यामध्ये आवश्यक ती सर्व कागदपत्रे त्याची सत्यता व अनुभव पडताळल्यानंतर संस्थेच्या नियमांनुसार उपहारगृह चालविण्यास सक्षम असलेल्या निविदाधारकांचा लिफाफा ब (दरपत्रक लिफाफा) उघडण्यात येईल.

४. आपली निविदा मंजुर झाल्यास आपणास त्वरीत रूपये २०००००/— (रूपये दोन लक्ष मात्र) सुरक्षा ठेव उपहारगृह सुरू करणेपुर्वी भरावी लागेल. त्यावर कसलेही व्याज मिळणार नाही. मुदत संपल्यावर हिशोबाअंती शिल्लक रक्कम परत मिळेल.

५. स्वयंपाकासाठी लागणारे इतर साहित्य उदा. अन्नधान्य, गॅस (व्यावसायिक सिलेंडर), दुध, भाज्या इ. स्वत: कंत्राटदारास आणावे लागेल. सर्वांची देयके उपहारगृह चालकांनी स्वत: दयावीत त्याबाबतीत कोणीही व्यक्ती संस्थेशी (उपहारगृह चालकाला पुरविणेच्या सामानासाठी) संपर्क करणार नाही याची काळजी घ्यावी.

६. संस्थेमधील आपल्याला दिलेल्या ताब्यातील पंखे, टयुबलाईट, फर्निचर, भांडी व इतर शासकीय मालमत्ता गहाळ अथवा तूटफूट झाल्यास सदरील साहित्याची सद्यस्थितीत होणारी रक्कम उपहारगृहचालकाकडून वसुल करण्यात येईल किंवा आपण जमा केलेल्या सुरक्षा ठेव रकमेतुन वसुल करण्यात येईल.

७. उपहारगृह मधील काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांचा पगार उपहारगृह चालकांनी स्वत: द्यावा. काम करणारे कर्मचारी स्वच्छता बाळगणारे असावेत. त्या सर्वांचे वैद्यकीय प्रमाणपत्र फोटोसह सादर करावे लागेल. आवश्यक तेवढे कर्मचारी उपहारगृहामध्ये कामासाठी ठेवावे लागतील. उपहारगृहामध्ये बालकामगार नियुक्त करता येणार नाहीत. उपहारगृहामधील कर्मचाऱ्यांना ड्रेसकोड असावा तसेच सदर कामगारांना संस्था परिसरात उपहारगृह चालकाकडून मिळालेले ओळखपत्र बाळगणे बंधनकारक राहील.

८. उपहारगृह चालकाने स्वत: व्यक्तिश: हजर राहुन उपहारगृह चालवावे लागेल. दुसऱ्या व्यक्तीस उपहारगृह चालविण्यास मनाई राहील.

९. अगोदराच्या दिवशी तळण्यात आलेल्या पदार्थांचे तेल हे स्वयंपाक करतांना वापरण्यात येवु नये.

१०. विद्यार्थ्यांना / कर्मचारी यांनी दिलेल्या उपहाराची ऑर्डर वेळेत मिळेल याची दक्षता घ्यावी. उपहारासाठी विनाकारण जास्त वेळ लागणार नाही याची दक्षता घेणे बंधनकारक राहील.

११. उपहारगृहात शिस्त पाळणे सर्वांना बंधनकारक राहील.

१२. सात्विक शुध्द उपहार देवून विद्यार्थ्यांसाठी प्रसन्न वातावरण तयार करावे.

१३. विद्यार्थ्यांना उपहारामध्ये उत्तेजक पदार्थ देण्यास मनाई आहे. तसेच विडी, सिगारेट, तंबाखु, गुटखा, मद्यपान इत्यादी उपहारगृहामध्ये ठेवता येणार नाही तसेच विद्यार्थ्यांना देता येणार नाही.

१४. उपहारगृह चालका कडील कामगारांना देखील कामावर असताना विडी,सिगारेट,तंबाखु,गुटखा,मद्यपान व उत्तेजक पदार्थाचे सेवन करता येणार नाही. तसे आढळल्यास कार्यवाही करण्यात येईल.

१७. सदरील कराराचा कालावधी हा **अकरा महिन्याचा** असेल या कालवधीच्या आत आपणास उपहारगृह बंद करता येणार नाही. काही अपरिहार्य कारणासाठी उपहारगृह बंद करावयाचे असल्यास कमीत कमी एक महिना अगोदर लेखी पुर्वसुचना द्यावी लागेल अन्यथा आपली सुरक्षाठेव रक्कम जप्त करण्यात येईल याची नोंद घ्यावी. **अकरा महिन्याचा अनुभव व खानावळीचा दर्जा या आधारे सदर करार पुढील शैक्षणिक वर्षाकरिता नुतनीकरण करण्याचे संपुर्ण अधिकार संस्थेकडे सुरक्षित आहेत**.

१८. नैसर्गिक आपत्ती, साथीचे रोग, इतर आपत्ती इत्यादी कारणामुळे उपहारगृह बंद राहिल्यास कराराचा कालावधी वाढविणे संस्थेस बंधनकारक राहणार नाही. तथापि सदर कालावधी वाढविणे / योग्य असल्यास त्याबाबतचा निर्णय संस्था प्रमुखाचा राहिल. करारनाम्याचा कालावधी वाढविल्यास त्या कालावधीत उपहारगृह चालकास सेवा देणे बंधनकारक राहिल.

१९. उपहारगृहाच्या मेनुबाबत समिती प्रमुखांशी वेळोवेळी चर्चा करून मेनू निश्चित करावा.

२०. उपहाराचा दर्जा उत्तम नसल्यास व तशी समिती प्रमुख हयांची खात्री झाल्यास उपहारगृह बंद करण्याचा अधिकार संस्थेस राहील याची नोंद घ्यावी.

२१. उपहारगृहाची वेळ सकाळी ७ ते सायं. ८.०० पर्यंत असावी.

२२. उपहारगृह चालकांनी स्वत:च संपूर्ण हिशोब ठेवायचा आहे. याची संपूर्ण जबाबदारी उपहारगृह चालकाची राहील.

२३. जेवणाची भांडी स्वच्छ असावी तसेच उपहारगृह हॉल, किचन, हात धुण्याची जागा व परिसर स्वच्छ ठेवावा. भांडयाची व्यवस्था स्वतः कंत्राटदाराची राहील.

२४. उपहारगृह चालकांचे विद्यार्थ्यांशी काही दुमत असल्यास किंवा विद्यार्थ्यांची तक्रार असल्यास वादविवाद न करता, उपहारगृह समिती प्रमुख यांच्याशी संपर्क करावा.

२५. उपहारगृह चालकाने सात्विक व पौष्टीक आहार देवुन घरगुती वातावरण निर्माण करावे, कर्मचारी व विद्यार्थ्यांचे संबंध सलोख्याचे व आदराचे ठेवणेसाठी उपहारगृह चालकाने लक्ष घालावे.शांतता, मैत्रीपुर्ण, प्रसन्न वातावरण निर्माण करून पर्यायाने शैक्षणिक दर्जा उंचावण्याकरिता संस्थेस मदत करावी.

२६. समितीने मान्य केलेल्या निविदाधारकास उपहारगृह चालविण्याचे आदेश दिल्यानंतर ३० दिवसांचे आंत उपहारगृह सुरू न केल्यास सदर निविदाधारकाची निविदा रद्द करून अनामत रक्कम जप्त केली जाईल. त्यानंतर दुसऱ्या क्रमांकावर असलेल्या निविदाधारकास उपहारगृह चालविण्याकरिता देण्याचे अधिकार समितीस असुन त्याही निविदाधारकास ३० दिवसांचे आत उपहारगृह सुरू करणे बंधनकारक असेल त्यानंतर पहिल्या क्रमांकाचे निविदा धारकाची अनामत रक्कम किमान ६० दिवसानंतर परत केली जाईल.

२७. संस्थेद्वारा उपहारगृहासाठी उपलब्ध करून देण्यात आलेली जागा व फर्निचर कार्यालयीन वेळेत प्रत्यक्ष येवुन पाहणी करता येईल.

२८. उपहारगृह चालकामार्फत कार्यरत असलेल्या कामगारांचा कामावर असतांना काही अपघात झाल्यास, चोरी झाल्यास इतर दुर्घटना घटल्यास त्याची संपूर्ण जबाबदारी उपहारगृह चालकाची राहिल. कार्यरत कामगारांची विमा उतरविण्याची सर्वस्वी जबाबदारी कंत्राटदाराची राहील तसेच अशा घटनेस

संस्था जबाबदार राहणार नाही व त्याबाबतीत कुठल्याही आर्थिक व इतर भरपाईची मागणी उपहारगृह चालकास संस्थकडे करता येणार नाही.

२९. उपहारगृहा मधील शिल्लक राहिलेले शिळे अन्न, जैविक कचरा व इतर टाकावू पदार्थ / वस्तु इत्यादीची योग्य ती विल्हेवाट संस्थेच्या परिसरा बाहेर लावण्याची जबाबदारी उपहारगृह चालकाची राहिल.

३०. उपहारगृह चालक व संस्था यांच्यात निविदेतील अटी शर्थीच्या अधिन राहून झालेल्या करारनाम्या बाबत कोणताही कायदेविषयक वाद उद्‌भवल्यास त्याकरिता भारतीय लवाद कायदा १९९६ तरतुदी लागू राहतिल. लवाद कार्यक्षेत्र छत्रपती संभाजीनगर राहिल व संस्था प्रमुख लवाद राहतील.

३१. उपहारगृह चालकास दिलेले काम असमाधानकारक आहे, असे वारंवार आढळून आल्यास याबाबतील काही वाद निर्माण झाल्यास रितसर नोटीस देवून सर्व सुरक्षा रक्कम जप्त करतांना मुदतपूर्व कंत्राट रद्द करण्याचा अधिकार संस्था प्रमुखाचा राहिल.

३२. कामाचा कालावधी पूर्ण होण्यापूर्वी उपहारगृह चालकाने काम सोडून दिल्यास, नंतर नव्याने निविदा मागवून घ्यावी लागल्यास आलेला दर चालू मंजूर दरापेक्षा जास्त आल्यास होणारी फरकाची रक्कम व संस्थेस झालेला खर्च असे एकंदरित काम अपूर्ण सोडणा—या उपहारगृह चालकाकडून वसूल करण्यात येईल.

३३. उपहारगृह चालवित असतांना कंत्राटदारास बंधनकारक असलेल्या बाबींचे उल्लंघन झाल्यास खालीलप्रमाणे दंड आकारण्यात येईल.

| अ.क्र | बाबींचा तपशिल | आकारण्यात येणा—या दंडाची तपशिल |
|---|---|---|
| १ | तक्रार / सुचना नोंदवही न ठेवणे | रु.५००/ प्रति दिवस |
| २ | पदार्थात कुठलाही किटक आढळणे | रु.५००/ प्रति घटना |
| ३ | पदार्थात प्लास्टिक / केस / दोरी / कपडा आढळल्यास | रु.५००/ प्रति घटना |
| ४ | पदार्थात दगड / खडे आढळणे | रु.५००/ प्रति घटना |
| ५ | अस्वच्छ भांडी / उपहारगृह परिसर | रु.५००/ प्रति दिवस |
| ६ | कच्चे न शिजलेले / बेचव अन्न आढळणे | रु.५००/ प्रति दिवस |
| ७ | कामगारांची अस्वच्छता व असभ्य वर्तन | रु.५००/ प्रति कामगार |

उपरोक्त बाबी शिवाय उपहारगृहाचा दर्जा विदयार्थ्यांच्या आरोग्यांच्या दृष्टीने अपायकारक आढळल्यास मा.प्राचार्य यांनी नियुक्त केलेली समिती तपासणी करुन मा.प्राचार्य त्यांची शहानिशा करुन कंत्राटदारावर उचित दंडात्मक कार्यवाही करतील. वरील बाबींचे उल्लंघन दुस—यांदा, तिस—यांदा इ. वेळेस झाल्यास दंडाची रक्कम दुप्पट तिप्पट याप्रमाणे वाढत जाईल व वारंवार सदर बाबी निदर्शनास येत असल्यास सदर कंत्राट तात्काळ संपुष्टात आणण्यात येईल.

३४ उपरोक्त अटी व शर्ती संबंधी काही वाद निर्माण झााल्यास त्यासंबंधी महाविदयालय प्रशाासनाचा निर्णय अंतिम राहील. तसेच उपरोक्त अटी व शर्तीमध्ये बदल / सुधारणा करण्याचा पुर्ण हक्क महाविदयालय प्रशासनाने राखुन ठेवला आहे.

३५ उपहारगृहात खालील प्रमाणे दर्जा (ब्रँड ) असणारे विविध प्रकारचे धान्य / पदार्थ वापरण्यात यावे.

| अ.क्र | पदार्थाचा तपशिल | पदार्थाचा दर्जा (ब्रँड ) |
|---|---|---|
| १ | गहु | १४७,सरबती,नर्मदा |
| २ | तांदुळ | कोलम,एचएमटी,इंद्रायनी |
| ३ | खादयतेल (रिफाइन्ड) | किर्ती गोल्ड,फॉर्च्युन,रीच सोया,जेमीनी |
| ४ | सर्व प्रकारच्या दाळी | चांगल्या प्रतीच्या |
| ५ | मसाले | एमडीएच,एव्हरेस्ट,सुहाना किंवा त्या प्रतीचे |

३६. यापूर्वी ज्या मेस ठेकेदारांना चालू आर्थिक वर्षात याच संस्थेत इतर ठिकाणी (मुलांची /मुलींची) वसतिगृह चालीवण्यास मिळाली आहे अशा ठेकेदारांनी निविदा भरु नये.अन्यथा त्यांची निविदा अपात्र करण्यात येईल.

३७. चांगल्या ग्राहकांकडून उपहारगृहासंबधीचा Feedback अपेक्षित आहे, कंत्राटदाराला चर्चेस बोलवण्यात येईल तेंव्हा उपहारगृह समितीचे समाधान करण्याची जबाबदारी कंत्राटदाराची राहील.

३८. उपहारगृहातील खाद्यपदार्थांचे Competent Authority कडून संस्थेच्या इच्छेनुसार Audit करण्यात येईल.

३९. बंद पाकीटातील (उदा. बिस्कीटे) यांच्या MRP पेक्षा जास्त दराने वस्तूंची विक्री करण्यात येवू नये.

४०. विदयार्थ्यांच्या हिताच्या दृष्टीने,भविष्यात संस्थेच्या परिसरात अतिरीक्त उनहारगृह सुविधा केंद्र स्थापित करण्यात आल्यास,त्यासाठी निविदादारांना पुरवठा आदेश देण्याचा अधिकार संस्थेस राहील.कमी दराने निविदादार विचारात घेऊन याबाबतचा निर्णय संस्था घेईल.या संबंधातील सर्व अधिकार संस्थेने आपल्याकडे राखुन ठेवले आहेत.

४१ . संस्थेच्या उपहारगृहातुन संस्था परीसर बाहेरील व्यक्तींना/खानावळींना अन्नपुरवठा,डबे,मेस इ.व्यवसाय करता येणार नाही.

४२. भविष्यात करार मुदतवाढ देण्यात आल्यास,दरवाढ करुन मिळणार नाही.

४३. पदार्थ विक्रीचे भावफलक करारानुसार दर्शनी भागात लावणे आवश्यक राहील.

४४. संस्थेच्या विविध विभागातील कार्यक्रम/सभा इत्यादीसाठी मागणीनुसार,करारातील दरानुसार सेवा पुरविणे आवश्यक राहील.